# IMR CAMPUS

**IMR Campus Newsletter Publish by** Director : Prof.Dr.Shilpa Bendale, Editor: Dr. Shama Saraf, Editorial committee: Anilkumar Marthi, Dr. Varsha Pathak, Dr. Anupama Chaudhari, Students Representive : Pranilshing Chaudhari, Swapnil Khadse, Saloni Patil.
**This Newsletter Publish for KCES's Institute of Management Research, Jalgaon inhouse use.**

**Institute's Vision:** Committed to provide value based, quality, professional and technical education to the students and empowering them with the reputed skillsets and competencies to face challenges of the fast changing global environment.

**Institute's Mission:** • To provide necessary technical and professional education with a view to uplifting the lives of rural and urban students. • To create conducive platform for students to develop their skills and knowledge. • To encourage innovation and research aptitude among students. • To inculcate global ethics and human values in all the learners.

## केसीई सोसायटीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आय.एम.आर. मध्ये आदर्श सरपंच श्री.भास्करराव पेरे पाटील यांचे व्याख्यान



ममुराबादच्या एम.बी.ए. सरपंच आणि आय.एम.आर.च्या माजी विद्यार्थीनी भाग्यश्री मोरे



ग्रामविकासचे शिलेदार, आदर्श सरपंच श्री.भास्करराव पेरे पाटील यांचे ग्रामीण व्यवस्थापन आणि अर्थकारण या विषयावर व्याख्यान आय. एम. आर. मध्ये सादर झाले. या वेळी व्यासपीठावर ममुराबादच्या सरपंच आणि आय. एम. आर. च्या माजी विद्यार्थीनी भाग्यश्री मोरे, आय. एम. आर च्या डायरेक्टर प्रा डॉ शिल्पा बेंडाळे उपस्थित होत्या. प्रास्ताविकात प्रा. डॉ. शिल्पा बेंडाळे यांनी ग्रामीण अर्थकारणाचे विविध पैलू आणि व्यवस्थापनातील वाढते महत्व विषद केले. आपल्या भाषणात श्री. भास्करराव पेरे-पाटील म्हणालेत, आपल्या कामाची दिशा योग्य हवी. त्यांच्या गावात त्यांनी सुरु केलेल्या पाणी व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, शौचालय व्यवस्थापन, धनकचरा व्यवस्थापन, सौर ऊर्जा वापर, रस्ते सुविधा (दुतर्फा फळझाडे लावलेले रस्ते), स्टीट लाईट, बायोगॅस नियोजन याविषयी अत्यंत विस्तृतपणे त्यांनी सांगितले. त्यासाठी टॅक्स आपले गावकरी अत्यंत जागरूकतेने भरतात. गावात आम्ही २४ तास ४ प्रकारचे पाणी पुरवतो, पुढे ते म्हणाले चार गोष्टींचे व्यवस्थित नियोजन केले तर देश नक्की महासत्ता होईल- त्यात स्वच्छ पाणी, स्वच्छ परीसर, वापरलेले पाणी योग्य प्रकारे जमिनीत जिरवण्यासाठी नियोजन, वृक्षसंवर्धनात फळझाडे लागवड अत्यंत महत्वाची आहे- चांगली आरोग्यवर्धक फळे हल्ली बाजारात दुर्मिळ गोष्ट आहे. तुम्ही इंजेक्शन टोचलेली फळे खाऊन तुमचे आरोग्य बिघडवत आहात. आणि शेवटचे पण अत्यंत महत्त्वाचे मुलांचे शिक्षण, याकडे योग्य प्रकारे लक्ष पुरवले गेले पाहिजे.

वृक्षारोपण संबंधात पण त्यांनी सांगितले की नव्या नवरा नवरीला गावात आल्यावर एक फळ झाड लावायची प्रथा आपण सुरु केली. गावातली सगळी मुले आज ताजे फळे तोडुन खातात. स्मशानात ३०० जांभळाची झाडे लावलीत.तिथे मुले खेळायला जातात. प्रथा कोणत्याच वाईट नाही त्यांना योग्य मोड द्या. मृत व्यक्तीची राख नदीत टाकू नका, झाडे लावा ही राख तिथे टाका.

हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला होता त्यामुळे अनेक गावातील सरपंच आणि ग्रामसेवक तसेच जिल्हा परीषदेचे अधिकारी उपस्थित होते. भाग्यश्री मोरे , सरपंच-ममुराबाद, माजी विद्यार्थीनी, आय. एम. आर. (एम. बी. ए. बॅच १७-१९) यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. बँकेची नोकरी नाकारून आपण या क्षेत्रात आल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी आय एम आरच्या शिक्षणाचा,येथील वातावरणाचा, व्यवस्थापन अभ्यासाचा कसा उपयोग होते हे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ शमा सराफ यांनी केले.

## अमृत महोत्सवी वर्षानिमित्त के. सी. ई. सोसायटीचे आय.एम.आर.मध्ये 'क्लायमेट पे बात' (चर्चासत्र) व पोस्टर-मॉडेल प्रेझेन्टेशन स्पर्धा.











या उपक्रमाअंतर्गत आय.एम.आर. मध्ये स्वच्छता अभियान सोबत प्रामुख्याने 'क्लायमेट पे बात' (चर्चासत्र) तसेच पोस्टर - मॉडेल प्रेझेन्टेशन स्पर्धा घेण्यात आल्या. याप्रसंगी प्रमुख उपस्त्रिती मा. मिनीनाथ दंडवते (जळगाव मनपा उपायुक्त), प्रा.एस.आर. थोरात (संचालक,पर्यावरण व भूगर्भशास्त्र प्रशाळा, KBCNMU), प्रा. डॉ. शिल्पा बेंडाळे (संचालक) आणि रोटरॅक्ट अध्यक्ष प्रणील चौधरी यांची होती.

या प्रसंगी झालेल्या परीसंवादातील तरुण वक्ते: श्रेयस पाटील या पर्यावरण कार्यकर्ता असलेल्या तरुणाने, इंडस्ट्रीअल कचऱ्याचे वितरण नीट केले पाहिजे. इलेक्ट्रॉनिक रिसायकलही नीट करावे लागेल. तर गिरीश घनःशाम पाटील (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य युवा छात्र संसद याने आपल्या विषयाची मांडणी करतांना ही माणुस वाचवण्याची चळवळ आहे.. हे संकट फार भीषण आहे आणि आपण चलता है असे वागतो आहे. आव्हाण्याचा वाळू उपसण्याची समस्या आणि विषय आम्ही विद्यार्थ्यांनी जाऊन बघितला.. आभ्यास केला. तिथे जनजागृती घडवुन आणली. आपणच आपले भविष्य सुरक्षित केले पाहिजे. त्यानंतर आश्लेषा अभय उजागरे ह्या पक्षीमित्र आणि सोलर एनर्जी मध्ये ग्रॅज्युएट विद्यार्थीनीने आपले या विषयावरआपले विचार मांडले. ती म्हणाली पशुपक्षी या जिवनसाखळीतील महत्वाचा दुवा आहे. त्यांना प्रयत्न पुर्वक वाचवले पाहिजे. त्यानंतर कु.मानसी शामकांत भावसार ही पत्रकार, लोकशाही लाईव्ह चॅनेलमधील विद्यार्थीनी म्हणाली, आपले नातवंडे आपल्याला बघायचे असतिल तर आपण पर्यावरण सांभाळावे लागेल. ज्या गोष्टी वापरात आहे त्या बंद आपण करू शकत नाही पण त्याचा वापर नीट करणे आपल्या हातात आहे . या परीसंवादाचे सुत्रसंचलन एम.बी.ए. चा विद्यार्थी प्रणीलसिंह चौधरी याने केले.

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ स्तरीय युवक महोत्सवात आय.एम. आर. विद्यार्थ्यांचे यश













**Two Gold Medal @ IMR**



**Box Cricket Winning Team**



International Chess Player Vaibhav Badgujar felicitated for selection of North Maharashtra University Team




आनाथाची आई सिंधुताई सपकाळ यांचे आय.एम.आर.मध्ये स्वागत करतांना संचालक, प्रा.शिल्पा बेंडाळे

**लोकमत**

## आयएमआरमध्ये क्रीडा महोत्सवाचे पारितोषिक वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव: केसीई सोसायटीच्या आय.एम.आर.मध्ये क्रीडा वेध हा वार्षिक क्रीडा महोत्सवाचे पारितोषिक वितरण सिंधुताई सपकाळ यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले.

यावेळी व्यासपिठावर सिंधुताई सपकाळ, के.सी.इचे सदस्य डी.टी.पाटील, प्रशासकीय अधिकारी शशीकांत वडोदकर, डी.बी. महाजन, आणि आयएमआरच्या संचालक प्रा.डॉ. शिल्पा बेंडाळे उपस्थित होत्या. क्रीडा वेधमध्ये ४५० खेळाडू सहभागी झाले होते. महाविद्यालयाचे जे विद्यार्थी राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय, आंतरविद्यापीठस्तरीय आणि राष्ट्रीय स्पर्धामध्ये खेळले त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.



खेळाडूंना पारितोषिक प्रदान करताना सिंधुताई सपकाळ, सोबत डॉ.शिल्पा बेंडाळे, डी.बी. महाजन.

### या खेळाडूंचा झाला गौरव

वैभव बडगुजर (बुद्धिबळ), प्रद्युम्न महाजन (क्रिकेट), रचना म्हस्के (सॉफ्टबॉल) रितल महाजन(पॉवर लिफ्टींग), क्शीत भानुशाली(ज्युदो), नवील शेख(फुटबॉल), स्वप्नील नीरजकर, वेदांत चौधरी, आदित्य चौधरी, (टेबल टेनिस),



**Rotract IMR**
**Subject - Thrill of Mountaineering**
**Speker: Umesh Zipre**




**Budget 2020**
**Speker - CA Sweta Chordiya**

## बुद्धिबळ स्पर्धेत आय.एम.आर., शासकीय अभियांत्रिकीला जेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

[illegible]



[illegible]

### वैयक्तिक गटाचे विजेते

[illegible]

# Lecture by Nilambari Joshi, a well known author and Industrial trainer at IMR on the occasion of KCE Amrut Mahotsav

## "Subject: Industrial psychology and leadership"





## जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त केसीईज आय एम आर मध्ये 'भावना व्यवस्थापन:' इमोशन: द मंत्रा ऑफ सक्सेस या विषयावर कार्यशाळा





येथील केसीईज आय.एम.आर. मध्ये भावनांचे व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळा झाली. या कार्यशाळेसाठी श्री. पंकज व्यवहारे, श्री शंतनु अग्रवाल आणि संदीप शर्मा उपस्थित होते. या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना संचालक प्रा. डॉ. शिल्पा बेंडाळे म्हणाल्या मानसिक आरोग्यासाठी काही गोष्टींची परत नव्याने ओळख करुन घ्यायची गरज आहे. शरीराला स्नान, मनाला ध्यान आणि बुध्दीला ज्ञान आवश्यक असते. पुढे जाण्यासाठी मानसिक ब्लॉक्स प्रयत्नपूर्वक काढले पाहिजेत. त्यानंतर बोलतांना पंकज व्यवहारे यांनी **REBT** टेक्निकची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. **REBT** हा स्वतःची स्वतःला ओळख करुन देणारा फॉर्मुला आहे. आपले विचार, आपली वर्तणूक आणि मनावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी हा उत्तम मार्ग आहे. आपल्या आभ्यासाला, आपल्या करीयरला योग्य मार्ग मिळतो. घडणारी घटना ही बऱ्याचदा आपल्या हातात नसते, अगदी तो एखादा कठीण प्रसंग असेल तरी, म्हणजेच घटना मोठी असेल तरी सोच पण मोठीच हवी. मोठा विचार करण्याची ताकद तुम्हाला योग्य परीणामांकडे घेऊन जाते. बऱ्याचदा घटना मोठी आणि परीणाम फारच छोटा असतो.. तर काही घटना अगदीच किरकोळ पण परीणाम फार प्रभावी असतो, याचे संयुक्तिक व्यवस्थापन प्रत्येकाच्या आयुष्यात आवश्यक आहे. ही कार्यशाळा रोटरॅक्ट क्लब आय.एम.आर. तर्फे आयोजित करण्यात आली होती. त्याला रोटरॅक्ट आय.एम.आर.सह इतरही सर्व रोटरॅक्ट क्लबचे सदस्य उपस्थित होते.



Our faculty member Mamta Dahad has been awarded Ph. D. under the guidance of Dr. Parag Narkhede from KBC North Maharashtra University, Jalgaon.

**MBA Course Vision:**

"To become a preferred Institute in the field of Management, to enhance value based education among the young aspirants".

**MBA Course Mission:**

- To develop the rural and urban students to be professionally competent.
- To inculcate values across all learning activities.
- To provide opportunities to showcase analytical skills and innovative thinking.
- To keep abreast students with changing global economy

**MBA Program Educational Objectives (PEO's)**

| PEO | PEO Statements |
|---|---|
| PEO-1 | Practice the management theories and concepts. |
| PEO-2 | Acquire skills to handle decision making for achieving organizational goals |
| PEO-3 | Imbibe values and ethics in the individual for organizational conduct. |
| PEO-4 | To develop leadership qualities & handle Managerial Environment |